

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ‘महाप्रित’च्या विविध प्रकल्पांची आढावा बैठक

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 04/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 146 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# जागतिक क्रीडा कॅलेंडरमध्ये पुण्याचे नाव स्थापित होणार

## पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टुर स्पर्धेच्या माध्यमातून चालना मिळणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




मुंबई राज्य शासनाच्या सहकार्याने पुणे जिल्हा प्रशासन व सीएफआयच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टुरच्या माध्यमातून वार्षिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकलिंग स्पर्धेचे आयोजन अतिशय स्तुत्य उपक्रम असून पुण्याला प्रमुख पर्यटन आणि जागतिक क्रीडा केंद्र म्हणून प्रस्थापित करणे या भव्य स्पर्धेमुळे शक्य होणार आहे. पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टुर स्पर्धा येत्या तीन चार वर्षांत निश्चितचं जागतिकस्तरावर लोकप्रिय स्पर्धा ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी पुणे आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफ आय ) यांच्यात पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टुर २०२६ च्या आयोजना साठी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुख्य सचिव राजेश कुमार, सीएफ आयचे अध्यक्ष पंकज सिंघ, जनरल सेक्रेटरी महिंद्र पाल सिंघ यांच्या सह संबंधित अधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासीक वारसा लाभलेली, परंपरा, संस्कृती आणि निसर्गसौंदर्यासह राज्याचे उत्पादन आणि तंत्रज्ञान हब असलेल्या पुण्यात या स्पर्धेच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रातील संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यासोबतच राज्यात पर्यटकांची संख्या अधिक वाढण्यास आणि त्याद्वारा राज्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळण्यासाठी देखील ही स्पर्धा सहाय्यक ठरणारी आहे. पुण्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्रगण्य पर्यटन स्थळ म्हणून प्रस्थापित करणे यातुन शक्य असून जागतिक क्रीडा कॅलेंडरमध्ये पुण्याचे नाव या स्पर्धेमुळे स्थापित होणार आहे, ही निश्चितच खुप आनंदाची बाब आहे. जगभरातील दोनश देशातून या सायकलिंग क्रीडा प्रकाराचे चाहते आहेत, त्यांच्यापर्यंत या स्पर्धेच्या निमित्ताने पुणे येथील निसर्गसौंदर्य, संस्कृती,परंपरा या सर्व गोष्टी पोहचण्यास मदत होणार असून त्यातुन पर्यटन आणि उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित होण्याची संधी आहे. तसेच ग्रामीण पुण्यात शाश्वत विकास आणि कनेक्टिव्हिटी, तंदुरुस्ती आणि पर्यावरण जागरूकतेची संस्कृती वाढवण्यास सहायक असलेली ही सायकलिंग स्पर्धा लोकांना एक आरोग्यदायी जीवनशैली स्विकारण्यास प्रोत्साहन देणारे पूरक वातावरण निर्माण करणारी आहे, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यावेळी म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सायकलिंगचे शहर अशी पुण्याची ओळख आहे. ती वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न या करारातून होईल. आंतरराष्ट्रीय सायकलिंग साठी पुणे शहराचे योगदान मोठे राहिलं, असे उपमुख्यमंत्री श्री.पवार यावेळी म्हणाले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पर्धेच्या आयोजनाबाबत सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. या स्पर्धेस सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (CFI) यांची मान्यता प्राप्त असून युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल (UCI), स्वित्झर्लंड यांच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे. UCI च्या मान्यतेनंतर लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ साठी पात्रता स्पर्धा म्हणून नामांकनास पात्र ठरणार आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून सह्याद्री पर्वत, किल्ले, ग्रामीण निसर्ग, जलाशय आणि वन्यजीव यासारख्या कमी परिचित तालुक्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचारास मदत होणार आहे.

# पिंपरी महापालिकेची ‘डीएमएस’ प्रणाली बंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेने ११२ कोटी रुपये खर्च करून एक एप्रिल २०२५ पासून सुरू केलेली दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली ( डीएमएस) यंत्रणा मंगळवारपासून बंद पडली आहे. त्यामुळे दोन दिवसांपासून महापालिकेचे सर्व प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे. आज (गुरुवारी) प्रणाली सुरू करण्यासाठी तांत्रिक उपायया ेजना केल्या जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.निगडी येथील डाटा सेंटरमध्ये विद्युतविषयक आणि तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने मंगळवारपासून ही यंत्रणा बंद आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने एक एप्रिलपासून कागदविरहित प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली. कामकाजात दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (डीएमएस) आणि कार्यप्रवाह प्रणाली (डब्ल्यूएफ) वापरण्यास सुरुवात केली. यासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस एनेबल ईआरपी प्रकल्पाअंतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व ठेकेदारांची देयके काढण्यासाठी ‘सॅप’ प्रणालीचा वापर केला जात आहे. विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाखा प्रमुख, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी डिजिटल कोड देण्यात आले आहेत.

एक हजार ७०९ डिजिटल स्वाक्षरी ‘की’ तयार करण्यात आल्या आहेत.

या प्रणालीवर ११२ कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

# हिंजवडी आयटी पार्क व वाहतूक कोंडीवर तातडीच्या उपाययोजना व्हाव्यात

## -आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई चिंचवड विधानसभा मतदारसंघातील हिंजवडी आयटी पार्क व परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, अपुऱ्या रस्त्यांची स्थिती व प्रशासनातील समन्वयाचा अभाव या गंभीर समस्यांकडे आमदार शंकर जगताप यांनी राज्याच्या पावसाळी अधिवेशनात लक्ष वेधले. या विषयावर लक्षवेधी सूचना सादर करत त्यांनी वाहनचालक व आयटीयन्सच्या दैनंदिन त्रासाबद्दल आवाज उठवला.

विधानसभेत बोलताना आमदार जगताप यांनी सांगितले की, “हिंजवडी फेज १, २ व ३ कडे येणाऱ्या नागरिकांना व आयटीयन्सना भूमकर चौक, डांगे चौक, लक्ष्मी चौक, ताथवडे, वाकड, पुनावळे, ॲम्स्टरडॅम कंपनीमार्गे जाणे भाग पडते. परिणामी, या रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी होते. या भागात ३० मीटरचा रिंग रोड, वाकड ते फेज थ्री मुळा नदीच्या पात्रातून रस्ता विकसित करणे शक्य आहे का, असा सवाल त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

त्याचबरोबर, हिंजवडी आयटी पार्कमधील नागरिकांनी वाहतूक समस्येमुळे थेट न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल केली असून, त्यामुळे पीएमसी, पीसीएमसी, पीएमआरडीए आणि अन्य यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यासाठी एकच वाहतूक नियोजक (Traffic Planner) नेमण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सार्वजनिक वाहतुकीसाठी निधी, स्मार्ट सिग्नलिंग प्रणालीची मागणी शंकर जगताप यांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने निधी मंजूर करून इंटेलिजंट स्मार्ट ट्रॅफिक सिग्नल सिस्टीम लागू करण्याची गरजही व्यक्त केली. ‘Urban Plan Development’ अंतर्गत फूटपाथची रुंदी कमी करून वाहनांसाठीचा मार्ग (Carriage Way) वाढविण्याचा विचार शासन करेल का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

लवकरच उच्चस्तरीय बैठक - माधुरी मिसाळया प्रश्नावर उत्तर देताना राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी, “चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील वाहतूक समस्या गंभीर आहे.


लवकरच या संदर्भात सर्व संबंधित विभाग व लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन संयुक्त बैठक घेण्यात येईल,” असे आश्वासन सभागृहात दिले.

तसेच, पुण्यात फर्ग्युसन रोडवर वाहतूक व्यवस्थापनासाठी राबवण्यात येत असलेल्या A I पायलट प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर हा प्रकल्प पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्रातही लागू करण्याचा विचार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मुद्द्यांवर तातडीने पावले उचलून संबंधित विभागांनी प्रभावी कार्यवाही करावी, अशी अपेक्षा मतदारसंघातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# हिंजवडी फेज 2 ते लक्ष्मी चौक रस्ता खुला करण्यास पीएमआरडीएकडून प्रारंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



हिंजवडी, मान, मारुंजी भागातील नागरी समस्या आणि वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठोस पावले उचलली असून अतिक्रमित रस्ते खुले करण्यास सुरुवात झाली आहे. यात प्रामुख्याने अतिक्रमित असलेला हिंजवडी फेज २ – विप्रो सर्कल ते मारुंजी लक्ष्मी चौक दरम्यानचा महत्त्वाचा रस्ता गुरुवारी (दि.३) वाहतुकीसाठी खुला करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ करण्यात आला.

हिंजवडी तसेच मेट्रो मार्गासह परिसरातील अतिक्रमणासह इतर काही ठिकाणी ओढे – नाल्यांतील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह परस्पर बदल / अडवल्याने संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने वाहतूक कोंडी तसेच नागरी समस्या सोडवण्यासाठी गुरुवारपासून पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईला सुरुवात करण्यात आली. यात काही वर्षांपासून अतिक्रमित बंद असलेला हिंजवडी फेज २ – विप्रो सर्कल ते मारुंजी लक्ष्मी चौकदरम्यानचा रस्ता वाहतुकीस खुला करण्यासाठी पीएमआरडीएसह विविध विभागांच्या समन्वयातून संयुक्त कारवाई सुरुवात करण्यात आली.

या रस्त्यादरम्यान अतिक्रमण केलेल्या काही व्यवसायिकांनी स्वतः आपले अतिक्रमण काढून घेत वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करून दिल्याचे कारवाईदरम्यान पुढे आले. अतिक्रमणामुळे रखडलेल्या या रस्त्याचे काम पीएमआरडीएकडून हाती घेण्यात आल्याचे वाहतूक कोंडीपासून मोठा दिलासा मिळणार आहे.

त्यामुळे स्थानिक नागरिक आणि आयटी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांसाठी हा रस्ता रहदारीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

# गणेश खुटवड यांना तरुण इतिहास संशोधक पुरस्कार जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : भारत इतिहास संशोधक मंडळाचा ११५ वा वर्धापन दिन ७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता वि. का. राजवाडे सभागृहात साजरा होणार आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'तरुण इतिहास संशोधक पुरस्कार' इतिहास संशोधनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गणेश खुटवड यांना प्रदान करण्यात येणार असल्याचे मंडळाच्या कार्यकारी समितीने जाहीर केले आहे.या कार्यक्रमात विविध ऐतिहासिक ग्रंथांचे प्रकाशन, त्रैमासिक अंकाचे लोकार्पण आणि महत्त्वपूर्ण पुरस्कार वितरण होणार आहे. मंडळाच्या वतीने देण्यात येणारा प्रा. श्रीकांत चौगुले पुरस्कृत 'तरुण इतिहास संशोधक पुरस्कार' यंदा गणेश खुटवड यांना जाहीर झाला आहे. इतिहास संशोधन क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत कार्यकारी मंडळाने त्यांची निवड केली असून, मंडळाने त्यांच्या योगदानाचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले आहे.

या कार्यक्रमादरम्यान मंडळाकडून जतन करण्यात आलेल्या लाखो मोडी, फारसी आणि पोथी स्वरूपातील ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभ्यासातून केलेल्या संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे.

# डिलिव्हरी बॉयनं 25 वर्षीय तरुणीवर केला बलात्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुण्यातील कोंढवा परिसरामध्ये डिलिव्हरी बॉय असल्याचं सांगून एका तरुणीवर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. आरोपीनं पीडित तरुणीवर अत्याचार केल्यानंतर तिच्यासोबत सेल्फी काढून तो पसरवण्याची धमकीही दिली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपीचा तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवारी (2 जुलै) संध्याकाळी ही घटना घडली. 22 वर्षांची ही तरुणी आयटी कंपनीमध्ये नोकरी करते. ही तरुणी कोंढवा परिसरात भावासोबत राहते.घटना घडली त्यावेळी तिचा भाऊ काही कामानिमित्ताने बाहेर गेल्याने ती घरी एकटीच होती. याच वेळी कुरियरची डिलिव्हरी करायची असल्याचं सांगून हा आरोपी तिच्या घरी पोहोचला.

असे काही कुरियर येणार नसल्याचे तरुणीने सांगितल्यानंतरही त्याने कागदपत्रांवर तशी सही करण्यास सांगितले. सही करण्यासाठी तिने सिक्युरिटी गेट उघडल्यावर तो आत शिरला आणि तिच्या चेहऱ्यावर स्प्रे मारून तिच्यावर अत्याचार केला.

यानंतर साधारण रात्री साडेआठच्या सुमारास या तरुणीला शुद्ध आल्यानंतर हा प्रकार तिच्या लक्षात आला. तिने आपल्या परिचयाच्या व्यक्तींना संपर्क साधून त्यांना घडलेल्या प्रकाराची कल्पना दिली.

त्यानंतर रात्री उशीरा कोंढवा पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली.

यानंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम 63, 77 आणि 351 (2) या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला.

# दिशा सालियानचा मृत्यू अपघाती, हत्येचा प्रयत्न नाही

## पोलिसांची उच्च न्यायालयात माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



दिशा सालियनचा मृत्यू हा अपघाती असून त्यात कोणताही घातपात किंवा हत्येचा प्रयत्न झाल्याचं आढळून आलेलं नसल्याचं मालवणी पोलिसांनी मुंबई उच्च न्यायालयात म्हटलं आहे. दिशा सालियन मृत्यूप्रकरणी तिचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यासाठी हाय कोर्टानं राज्य सरकारला दोन आठवड्यांची अंतिम मुदत दिली आहे. बुधवारी (2 जुलै) या प्रकरणी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

या प्रकरणी हाय कोर्टानं राज्याच्या मुख्य सचिवांना उत्तर देण्याचे आदेश दिलेले असतानाही मालवणी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी उत्तर दिल्याचं याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाच्या लक्षात आणून दिलं.

या प्रकरणी सुनावणी करण्यापूर्वी आमची देखील बाजू जाणून घ्या, अशी याचिका आदित्य ठाकरेंनी दाखल केली होती. या हस्तक्षेप याचिकेवरही सतीश सालियान यांचे वकील नीलेश ओझा यांनी कोर्टात उत्तर दाखल केलं आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 04/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठ प्रांजलीचा डबल सुवर्ण धमाका!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

एमटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, विश्वराजबाग पुणेच्या स्कुल ऑफोइंजिनियरिंगची विद्यार्थीनी प्रांजली विनोद सुरदुसे हिने नुकत्याच गाव येथे पार पडलेल्या १०वी ज्येष्ठ गट राष्ट्रीय गोल्फ अजिंक्यपदाच्या स्ट्रोक महिला सांघिक गटात आणि श्री जगदीश प्रसाद झाबरमल टिबरेवाल युनिव्हर्सिटी, मुंबई येथे अखिल भारतीय विद्यापीठ मिनि गोल्फ अजिंक्य पदाच्या एकेरी स्ट्रोक गटात सुवर्णपदक पटकावत दैदीप्यमान सत्याची नोंद केली आहे.



प्रांजलीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना ६ त्यांच्या संघात कमी ६२ गुण घेतले सर्वोत्चची नोंद केली. महाराष्ट्र पाठोपाठ मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेश संघांनी रौप्य व कांस्य पदक पटकवले. यासह अखिल भारतीय सर्वाधिकारी सातही ठेवताना दैदिप्यमानाची नोंद करत सुवर्णपदक पटकाविले. प्रांज हीटी एडीटी युनिव्हर्सिटी अत्यंत हुरहुन्नरी पक्षी असून काही पूर्वीच ३७ व्या राष्ट्रीय मिनीगोल्फ करताना महाराष्ट्र संघाचे सदस्यत्व व जेजेयूटी युनिव्हर्सिटी झुंझनू, राजस्थान येथे धक्का अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जमिनीवर गोल्फ अजिंक्यपद सुवर्णपदक पदक देखील पटकावलेले होते.

# मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'महाप्रित'च्या विविध प्रकल्पांची आढावा बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : महात्मा फुले नवीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) या उपकंपनीने भविष्यातील आव्हानांचा विचार करून दीर्घकाळ टिकणाऱ्या प्रकल्पांना प्राधान्य देऊन ते पूर्ण करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत असलेल्या महात्मा फुले नविकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) च्या विविध प्रकल्पांचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश कुमार आदी उपस्थित होते.

बैठकीत ठाणे समूह विकास प्रकल्प, सॉफ्टवेअर तंत्रज्ञान आणि डेटा सेंटर प्रकल्प, भिवंडी महापालिकेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांसाठीचा रुफ टॉप सोलर प्रकल्प, एनटीपीसी ग्रीन सोबत सोलर/हायब्रिड प्रकल्प राबविणे, एनटीपीसी ग्रीन, एनआयआरएल, सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया - एसईसीआय यांच्या संयुक्त भागीदाराने उभारण्यात येत असलेले सौर उर्जा प्रकल्प, डिस्ट्रिक्ट कुलिंग सिस्टीम प्रकल्प, नागपूरमधील राष्ट्रीय कर्करोग संस्थेच्या आवारात सोलर प्रकल्प उभारणे, पुणे महापालिकेचे एकात्मिक कमांड आणि कंट्रोल सेंटर उभारणे, महालक्ष्मी मंदिर व परिसराचा पुनर्विकास इत्यादी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या विविध प्रकल्पांच्या प्रगतीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी समाधान व्यक्त केले.

झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प वेगात पूर्ण करावेत. सर्वच क्षेत्रांमध्ये प्रकल्प राबवण्याऐवजी विशिष्ट क्षेत्रात तज्ज्ञता (एक्स्पर्टीज) मिळवून त्या ठराविक क्षेत्रातच काम करावे, असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव के.एच. गोविंदराज, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, संचालक विजय काळम पाटील, महात्मा फुले महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब बेलदार आदी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968